पशुसंवर्धन विभाग

E-mail-dahosatara@gmail. Tel.No./Fax - 02162 233793

जा.क्र.साजिप/पशुसं/सकुविग/७०५/२०१८
पशुसंवर्धन विभाग
सातारा जिल्हा परिषद, सातारा
दिनांक ३०/०६/२०१८

प्रति,

मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)
सातारा जिल्हा परिषद, सातारा

विषय - एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम योजनेची प्रसिध्दी देणेबाबत.....

महोदय,

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम ही योजना राबविणेत येत आहे. सदर योजनेची अम्मलबजावणी करणेसाठी व्यापक प्रसिध्दी व्हावी. यासाठी सोबतच्या प्रसिध्दी पत्रकाप्रमाणे सातारा जिल्हा परिषद, सातारा या संकेत स्थळावरुन प्रसिध्दी देणेत यावी, ही विनंती.

सहपत्र -
१) प्रसिध्दीपत्रक
२) अर्जाचा नमुना

आपला विश्वासू

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

# प्रसिध्दीपत्रक

**पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सातारा अंतर्गत जिल्हा वार्षिक योजने (सर्वसाधारण योजना) अंतर्गत एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम सन २०१८-१९ अंतर्गत एक दिवशीय सुधारीत मिश्र कुक्कुट पिल्लांचे गट वाटप योजना :-**

एक दिवशीय सुधारीत कुक्कुट पक्षांच्या पिल्लांचे गट वाटप या कार्यक्रमांतर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर प्रति लाभार्थी एक दिवशीय सुधारीत कुक्कुट पक्षांच्या (आर.आय.आर., ब्लॅक अॅस्ट्रोलार्प, गिरीराज, वनराज, कडकनाथ व इतर शासन मान्य जातीचे पक्षी) १०० पिल्लांचे गट वाटप करणेत येणार आहे. एक गटाच्या (१०० एक दिवशीय पिल्लांची) खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १.एक दिवशीय १०० पिल्लांची किंमत | रुपये | २०००/- |
| २.खाद्याऐवजी प्रत्येक लाभार्थीचे बँक खाते मध्ये जमा करावयाची रक्कम दोन टप्यामध्ये | रुपये | ६०००/- |
| ३.वाहतूक खर्च | रुपये | १००/- |
| ४.औषधे | रुपये | १५०/- |
| ५.रात्रीचा निवारा | रुपये | १०००/- |
| ६.खाद्याची भांडी | रुपये | ३५०/- |
| ७.लाभार्थीने पक्षांना पुढील कालावधीसाठी दयावयाची खाद्याची रक्कम | रुपये | ६४००/- |
| | एकूण | १६०००/- |

त्यापैकी ५० टक्के अनुदानातून रु.८,०००/-चे मर्यादेत प्रति लाभार्थी एक दिवशीय पिल्ले (किंमत रु.२,०००/-) आणि खाद्याऐवजी प्रत्येक लाभार्थीचे बँक खाते मध्ये जमा करावयाची रक्कम दोन टप्यामध्ये (रु.६,०००/-) जमा करणेत येणार आहे. व उर्वरीत रु.८,०००/- खर्च लाभार्थीने करावयाचा आहे.

सदर योजनेअंतर्गत वरीलप्रमाणे रु.८,०००/- किंमतीचे ४०० लाभार्थींना गट वाटप करणेकरीता लाभार्थींचे अर्ज मागविणेत येत आहेत. प्राप्त लाभार्थींची निवड व जिल्हा स्तरावर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सातारा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमार्फत निवड करणेत येणार आहे. त्यासाठी ३० टक्के महिला, ३ टक्के विकलांग लाभार्थी दारिद्रय रेषेखालील लाभार्थी, भूमिहीन शेतमजूर, मागासवर्गीय, अल्प व अत्यल्प भूधारक लाभार्थी यांना प्राधान्य क्रमाने निवड यादीत समावेश केला जाईल.

सदर योजनेकरीता लाभार्थीने करावयाच्या अर्जाचा नमुना पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती (सर्व) यांचेकडे उपलब्ध होतील. अर्ज मागविणेची मुदत दि.३०/०६/२०१८ ते ३०/०७/२०१८ राहील. त्यांनतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही. या पूर्वी या योजनेचा लाभ घेतलेल्यांना व एकदा लाभ घेतलेनंतर पाच वर्षापर्यंत या योजनेचा लाभ घेता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

दिनांक-

अर्ज नोंदनी क्रमांक-

**पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा सन २०१८-१९ मध्ये एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमांतर्गत ५० % एक दिवशीय सुधारीत कुक्कुट पक्षांच्या पिल्लाचे गट वाटप योजनेअंतर्गत लाभार्थी निवडी करीता करावयाचा अर्ज**

अर्जाचा नमुना

| मागील ३ महिन्यातील पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

१. अर्जदाराचे नांव - श्री/श्रीमती-----------------------------------------------------------------------

२. अर्जदाराचा संपूर्ण पत्ता – गावाचे नाव(मु.पो) --------------------------

तालुका-----------------------------------

जिल्हा सातारा, पिन कोड --------------------

अर्जदाराचे दूरध्वनी क्र.-----------------------

३. अर्जदाराचे वय (अर्ज करावयाचे तारखेस) ---------------------------

४. लिंग- **स्त्री/ पुरुष** (लागू नसलेले खोडा)

५. जात व संवर्ग ------------------------

६. अर्जदार द्रारिद्रय रेषेतील आहे का? - **होय/नाही** असल्यास प्रत जोडावी

७. अर्जदार भूमिहीन शेतमजूर, अत्यल्प /अल्प भूधारक आहे का**?** दाखला जोडवा

८. कुक्कुट प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास - **होय/नाही** (प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत)

९) अर्जदार बचत गटाचा सदस्य आहे का ? - **होय/नाही** असल्यास बचत गटाचे नांव व पत्ता

-------------------------------------------------------------------------------

१०) अर्जदार सुशिक्षित बेरोजगार आहे का ? - **होय/नाही**

प्रमाणित करतो/करते की, वरीलप्रमाणे दिलेली माहिती खरी आहे. या योजनेअंतर्गत योजनेतील अटी व शर्ती मला मान्य असून, याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

स्वाक्षरी

अर्जदाराचे संपूर्ण नांव

**टिप - आवश्यक तेथे पुष्ठयर्थ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.**

१) ओळखपत्र

२) रेशन कार्ड

३) ७/१२ दाखला/उतारा

४) ८ अ उतारा/दाखला

५) अपत्याचा दाखला (स्वंय घोषणापत्र)

६) अल्प व अत्यल्प भूधारक असलेचा तलाठयाचा दाखला

७) जातीचा दाखला (आवश्यक असलेस)

८) भूमिहीन शेतमजूर असलेचा तलाठयाचा दाखला

९) दारिद्रय रेषेखालचा दाखला क्रमांकासह व गुणासह

१०) शासकीय सेवेत नसल्याचा दाखला

११) अंपग असल्यास दाखला

१२) यापुर्वी या योजनेचा लाभ घेतला आहे/नाही

१३) रहिवासी दाखला